# प्रेसनोट

दि. ०७/०३/२०२१

## कामशेत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस अंमलदार यांचेवर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

---

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | कामशेत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण, गु.र.नं. ४१/२०२१ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७,१२ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | आरोपी लोकसेवक – १) अरविंद दौलत चौधरी , वय – ५० वर्षे, पद - पोलीस निरीक्षक, वर्ग १<br>२) प्रफुल्ल प्रभाकर कदम, वय – ३३ वर्षे पद - सहायक पोलीस निरीक्षक, वर्ग २<br>३) महेश विनायक दौंडकर, वय – ३९ वर्षे पद - पोलीस हवालदार, वर्ग ३<br>सर्व नेमणुक – कामशेत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,५०,०००/-(अडीच लाख रूपये)<br>पडताळणी दरम्यान तडजोडीअंती २,००,०००/- रूपये |
| लाच स्वीकारली रक्कम | १,००,०००/- (एक लाख रूपये) |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी दिनांक :- दि. ०५/०३/२०२१ व दि.०६/०३/२०२१<br>सापळा दिनांक :- ०६/०३/२०२१<br>तक्रारदार यांचे मामा यांचेवर फसवणुकीची केस दाखल असून जामीनाबाबत म्हणणे सादर करण्यासाठी आरोपी लोकसेवक क्र १ व ३ यांनी मागणी करून ती क्र. ३ यांनी स्वीकारली. आरोपी लोकसेवक क्र. ०२ यांनी सदर लाच मागणीस प्रोत्साहन दिले म्हणून कामशेत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून मा. विशेष न्यायालयाने अटक आरोपींना दिनांक १०/०३/२०२१ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे. गुन्हयाचा तपास श्रीमती अलका सरग, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे युनिट या करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे, श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे,पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. फेसबुकपेज- www.facebook.com-maharashtraACB
७. वेबसाईट- www.acbmaharashtra.gov.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.